International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भक्ती चळवळ : मानवमुक्तीचा आविष्कार

**डॉ. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके**
*पोस्ट डॉक्टरल संशोधक, मराठी विभाग,*
*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.*
*Corresponding Author – डॉ. अमोगसिद्ध शिवाजी चेंडके*

DOI - 10.5281/zenodo.18654091

भक्ती चळवळ ही मध्ययुगीन भारतातील एक प्रभावी सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक चळवळ होती. कर्मकांड, जातिभेद आणि अंधश्रद्धांनी ग्रस्त झालेल्या समाजाला मानवतेचा नवा दृष्टिकोन देण्याचे कार्य या चळवळीने केले. संतांनी ईश्वरभक्तीला केंद्रस्थानी ठेवून प्रेम, करुणा, समता आणि बंधुता यांचा संदेश दिला. जात, धर्म, भाषा किंवा लिंगभेद न मानता प्रत्येक माणूस समान आहे, ही भावना भक्ती चळवळीच्या विचारातून प्रकट होते. त्यामुळे भक्ती चळवळ ही केवळ धार्मिक नव्हे, तर मानवतावादी मूल्यांची प्रेरणादायी चळवळ ठरते.

**भक्तीचे उत्थान:**

संत चळवळ ही बाराव्या शतकात चक्रधर किंवा ज्ञानेश्वरांपासून सुरू झाली असे म्हटले जाते, पण हे खरे नाही. संत चळवळीचा प्रारंभ तामिळनाडूत सातव्या शतकापासून झालेला आहे. तेथील ‘नायनार’ आणि ‘आळवार’ या शैव आणि वैष्णव पंथातील संतांनी या चळवळीचा पाया घातला. नंतर ही चळवळ कर्नाटकात गेली. त्याचा स्पर्श महाराष्ट्राला झाला. महाराष्ट्रात मात्र भक्तीचा उत्कर्ष झाला. या संदर्भात भागवतपुराणात एक श्लोक आहे.

“उत्पन्ना द्रविडे साहं वृद्धी कर्नाटके गता ।
क्वचित्क्वाचिन्महाराष्ट्र गुजरे जाणता गता ॥”[१]

या श्लोकाचा अर्थ असा की, भक्ती द्रविड प्रदेशात उत्पन्न झाली, कर्नाटकात ती वाढली, महाराष्ट्रात तिला सन्मान प्राप्त झाला. परंतु गुजरातेत गेल्यानंतर मात्र ती जीर्ण झाली. दक्षिण भारतातील नायनार आणि आळवार या दोन्ही पंथाच्या संदर्भात मनमाडकर महाराज लिहितात, “माणिक्कवाचक, संबंध, वाणीश आणि सुंदर इत्यादि शैव संत एकूण ६४ झाले. यातील चार निर्दिष्ट संतांनी अमृतवाणी संकलित करून दोन साहित्य ग्रंथांची निर्मिती केली. ‘देवरम्’ – भगवत प्रेमाचा हार आणि दुसरा ‘तिरूवाचक्कम’ = पवित्रवाणी तसेच, वैष्णव संत जे झाले ते ‘आळवार’ म्हणून प्रसिद्ध आहेत. आळवार म्हणजे ‘अध्यात्मसागरात सखोल बुडी मारून बसणारी व्यक्ती’ हे संत भगवंताचे खरे निस्सीम उपासक होते. भगवान विष्णूच्या नितांत प्रेमात स्वतः विलीन होऊन इतरांसही विलीन करणे हे त्यांच्या जीवनाचे व्रत होते.”[२]

**भक्ती : सामाजिक चळवळ:**

भक्ती चळवळीच्या संदर्भात बारकाईने काही गोष्टी समजून घेतल्या तर भक्तीमधील चीड, संघर्ष, व्यवस्थेविरुद्धचा आवाज संतरचनेतून लक्षात येईल. त्यासाठी भक्तीकडे ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. म्हणजे लक्षात येईल की भक्ती ही सामाजिक समतेसाठीची चळवळ आहे.

भारतातील भक्ती चळवळ ही इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेच्या वाहक असलेल्या संस्कृत भाषेच्या संदर्भात आहे. या काळात संस्कृत भाषेला आव्हान मिळते. देशी भाषेत हे ज्ञान आणले जाते. मध्ययुगातील दिखाऊ धर्माच्या विरोधात विद्रोह करू पाहत होते. संतांच्या साहित्यातून हा विद्रोह लक्षात येऊ शकतो. मध्ययुगात सामान्य माणसाचे अस्तित्व हे दबलेले, पिचलेले होते. सामान्य लोकांना आत्मसन्माची जाणीव व्हावी यासाठी लोकांचे प्रबोधन केले. मध्ययुगीन बहुतेक संत हे कनिष्ठ जाती वर्गातील होते. उदाहरण द्यायचे झाल्यास दक्षिणेतील एकूण बारा आळवार संतांपैकी फक्त दोन ब्राह्मण होते. हेच तत्त्व वारकरी संप्रदायालाही लागू होण्यासारखे आहे.

नैतिकदृष्ट्या ढासळलेल्या समाजाला जागृत करण्यासाठी, त्यांना बळ देण्यासाठी संतांनी भक्तीची सामाजिक चळवळ उभी केली. संतांच्या मनात बंडखोरी होती, पण ते व्यवहारात विनयशील होते. म्हणून संतांच्या वाङ्‌मयात कारुण्य भरभरून वाहत आहे. हे कारुण्य नीट समजून घेतले पाहिजे. भक्तीची प्रेरणा जरी भगवद्गीतेची असली, तरी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी संतांनी भक्तीचे साहाय्य घेतले आहे.

**भक्तीतून मानवमुक्ती:**

भक्ती निमित्त असून माणूस हा भक्तीतून खऱ्या अर्थाने माणूस झाला पाहिजे, यासाठी त्यांनी भौतिक गोष्टींचे आचरण करणे आवश्यक आहे. सर्व जीवांच्या ठायी ईश्वर भरलेला आहे, माणूस म्हणून आपण सर्व एक आहोत, अशा उदात्त मूल्यांमुळे माणूस भक्तीच्या माध्यमातून मुक्ती मिळविण्याचा प्रयत्न करतो. या संदर्भात डॉ. रावसाहेब कसबे लिहितात, “भक्ति आंदोलनाचा विचार नेहमीच ईश्वरकेंद्री पद्धतीने केला जातो. परंतु वास्तविक पाहता भक्ती ही स्वतःला मुक्त करण्याची, स्वतःला हरवण्याची कला आहे. ती परमात्म्याला शोधण्याची कला नाही. भक्त जेव्हा मुक्त होतो, स्वतःच स्वतःला हरवून बसतो तेव्हाच भक्ती सार्थकी लागते.”[३] डॉ. कसबे यांनी भक्ती आंदोलनाकडे मानवी मुक्तीच्या दृष्टीने पाहिले आहे. यासाठी ते सूफी, बाऊल आणि नायनार, आळवार संतांचे दाखले देतात.

भक्तीची प्रेम आंदोलन म्हणून मध्ययुगात चर्चा झाली. शृंगार भक्ती किंवा मधुराभक्ती हे त्याचेच उदाहरण आहेत. परमात्म्याशी एकरूप होण्यासाठी भक्ताने ‘स्त्रीच’ बनले पाहिजे, असा सिद्धांत त्याकाळी होता. ‘कांताभाव’ हा भक्तिसाधनेचा आत्मा बनला आणि भक्ती आंदोलन हे एक प्रेम आंदोलन बनले. संतांनी माणसांना जगण्याचे प्रयोजन सांगितले. रुसवे-फुगवे, विरह-वेदना, मिलनाचा आनंदोत्सव या गोष्टींना भक्तीत प्रेमाचेच स्थान होते.

संतांनी ईश्वरावर प्रेम करण्यास सांगितले. ईश्वर हा आपला सखा समजून त्याला आपलेसे करून घेण्यासाठी प्रेमभक्ती सांगितली. सूफी संतांनी तर धर्म आणि धर्मशास्त्रापेक्षा प्रेमालाच महत्त्व दिले. माणसाच्या आयुष्याचे सार्थक प्रेमातच शोधले. सूफींनी देव-भक्त नात्यांच्या संदर्भात ‘प्रेम’ या भक्तितत्त्वाचा पुरस्कार केला.

सूफी कवी रूमी ईश्वराचे प्रेम तर मान्य करतोच. पण ईश्वर हा सौंदर्यमान आहे त्याचे सौंदर्य हे दैवी आहे, असे म्हणतो. त्यांची Divine Beautly ही कविता उल्लेखनीय आहे. रावसाहेब कसबे यांनी या कवितेचे मराठीत रूपांतर पुढीलप्रमाणे केले आहे.

“ईश्वराने ज्यात केलेली असते भेसळ, पृथ्वीच्या धुळीची
त्याचीच घेतात चव राजेलोक, त्यालाच स्वच्छ करून
तू मात्र हो एक घोट सौंदर्याचा, ईश्वराने निवडून ठेवलेल्या
कापातून
तोच तर आवडतो प्रेमिकाला, ज्याने ओठांना लागत नसतो
चिकनमातीचा लेप

म्हणून कर विचार आणि नंतर लाव ओठांना, जेव्हा ते असते
पवित्र आणि
शुद्…. अशा वेळी तू घेशील शेकडो चुंबने
प्रेमानंदाची."४

सूफींमध्ये ईश्वर हा प्रेयसी असून, भक्त मात्र प्रियकर अशी कल्पना आहे. वारकरी संप्रदायात हाच धागा पाहिला, तर याउलट 'कांताभाव' असल्याचे लक्षात येईल. संतांनी भक्तीमध्ये प्रेमाला खूप महत्त्व दिले आहे. उदा. १) 'प्रेमपिसे भरले अंगी। गीत संगे नाचो रंगी-संत नामदेव. २) प्रेमविण भजन। शृंगार पै केला। संत तुकाराम भक्तिप्रेमाविण ज्ञान नको देवा- संत एकनाथ. संत वाङ्मयामध्ये कृष्ण परमात्म्याला प्राप्त करण्यासाठी मीरा आणि राधा भक्ती करतात. मीरा तर स्वतःच भक्ती बनून श्रीकृष्णामध्ये विलीन झाली.

भक्तीच्या मुक्तीमुळे बहुजन वर्गातील लोकांमध्ये जागृती झाली. परिणामी अनेक संत विशिष्ट जातीगटांतून आले. मध्ययुगीन काळात कर्मकांडाचे जोखड असताना स्त्रियांना धार्मिक कार्यात कोणतेही स्थान नसण्याच्या कालखंडात इथली स्त्री आपले भगवंताविषयीचे प्रेम व्यक्त करू शकते. हे मोठे धाडस आहे. धर्मशास्त्रांनी स्त्रियांना गौणत्व दिले होते, स्त्रीला 'पापयोनी' म्हणून हेटाळणी केली, परमार्थ मार्गातील अडसर असेही म्हटले जायचे. पण या सर्व गोष्टींना भक्ती आंदोलनाने आव्हान दिले. ही स्त्रीमुक्तीची पहिली पायरी ठरते. भक्ती आंदोलनाने स्त्रियांनादेखील आत्मभान दिले. राबिया बसरी, अक्कमहादेवी, आंदळ अशा महान स्त्रियांनी या कालखंडात भक्तीबरोबर इतर आध्यात्मिक कार्याचा मार्ग अनुसरला. कर्नाटकामध्ये स्त्रियांच्या ईश्वरभक्तीच्या आड येणाऱ्या मर्यादा त्यांनी तोडून टाकल्या.

एका अर्थाने भक्ती हे माध्यम माणसाच्या मुक्तीचे साधन बनत चालले होते. स्त्रिया मुक्त होणं, लिहिणं आणि महात्मा पदावर पोहोचणे त्या काळात अशक्य होते. पण भक्तीच्या माध्यमातून बहुजन समाजातून अनेक संत निर्माण झाले. कट्टरवादाला विरोध करून ही मंडळी प्रबोधन करत होती. राबिया ह्या सूफी संत स्त्रीने तर कुराण जसेच्या तसे न स्वीकारता त्याची मोडतोड केली. भक्तीने स्त्रियांना आत्मभान दिले. प्रेमाच्या अभिव्यक्तीसाठी अवकाश निर्माण केले. राबिया यांच्या काही ओळी पाहिल्या तर लक्षात येईल की, भक्तीच्या माध्यमातून प्रेम कसे व्यक्त झाले आहे. रावसाहेब कसबे यांनी मराठीत राबियांच्या ओळी पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

"जर मी करीत असेन आत्यंतिक प्रेम तुझ्यावर, नरकाच्या
भीतीने
तर भस्म कर मला नरकातच, माझे निस्सीम प्रेम असेल
स्वर्गलालसेपोटी
तर कर बंद स्वर्गाचे दरवाजे कायमचे माझ्यासाठी
परंतु,
जर असेल माझे प्रेम केवळ तुझ्याचसाठी, तर मात्र मला ठेवू
नकोस वंचित
तुझ्या अनंत सौंदर्यापासून''५

भक्तिप्रेमातील हे काव्य माणसाला मुक्तीची प्रदानता देते. ईश्वरावर करत असलेल्या प्रेमाचा हा उघड जाहीरनामा कौतुकास्पद आहे. भक्तिमार्गात स्त्रियांचे आगमन होणे, ही एक क्रांती होती. दबलेली, पिचलेली स्त्री भक्तीप्रेमाच्या माध्यमातून व्यक्त झाली. धर्माला, व्यवस्थेला आव्हान देणे खूप कठीण कार्य होते, ते या भक्तीच्या माध्यमातून संतांनी केला.

**वारकरी संतांचा भक्तिविचार:**

महाराष्ट्रात तेराव्या शतकात घडून आलेले भक्ती आंदोलन अनेक अर्थानी महत्त्वाचे आहे. आधीच्या कालखंडात अनेक भक्तिसंप्रदायी आचार्य झाले. शंकराचार्य, रामानुज, वल्लभइ. आचार्यांनी धर्म, तत्त्वज्ञान

आणि भक्तिविषयक कार्य केले. पण त्याचा परिणाम महाराष्ट्रातील सामान्य जनतेवर झाला नाही. आचार्यांचे कार्य सधन सत्ताधीश वा विशिष्ट लोकांपुरतेच मर्यादित होते. तरीही आचार्यांचे कार्य मोठे आहे. पण संस्कृतभाषेची अस्मिता, विद्वत्ता, लोकप्रतिष्ठा, मठ, गादी हे सोडून मराठी लोकांशी ते एकरूप होऊ शकले नाहीत.

महाराष्ट्रात अर्धश्रद्धेच्या स्तोमाने टोक गाठले होते. ब्राह्मणांसाठी पंचमहायज्ञ व इतरांसाठी पौराणिक व्रते होती. 'व्रतार्क', 'व्रतकौमुदी', 'व्रतराज' आणि 'चतुवर्गचिंतामणी' अशा ग्रंथांची निर्मिती होऊन यालाच महत्त्व प्राप्त झाले होते. हेमाद्रिपंडिताने या ग्रंथांच्या माध्यमातून प्रतिदिन ५ ते १० व्रते सांगितली. यात स्मृति आणि पुराणांचा दाखला दिलेला आहे. म्हणून तत्कालीन समाज हा धार्मिक अराजकतेमध्ये अडकला होता. धर्मकल्पनेच्या वर्चस्वाखाली सामान्य माणूस दबला होता. वर्णाश्रमधर्माचे कटाक्षाने पालन केले जात होते. स्त्रियांना पारमार्थिक क्षेत्रात अधिकार नव्हता. कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. अशा या परिस्थितीत जैन, लिंगायत व महानुभाव पंथांनी आपल्या धर्ममताचा प्रसार सुरू केला. पण महाराष्ट्रावर त्याचा विशेष प्रभाव पडला नाही. वारकरी संप्रदायाचे संघटन ज्ञानदेवांनी केले. नामदेवांनी प्रसार केला, नाथ तुकाराम आदि संतांनी वारकरी संप्रदायाच्या प्रसार कार्याला योगदान दिले.

**वारकरी संप्रदाय आणि भक्ती:**

भक्ती हा वारकरी संप्रदायाचा आत्मा आहे. भक्तीमुळेच वारकरी संप्रदाय समाजोन्मुख झाला. वारकरी संप्रदाय वेदांना मानणारा असला तरी वैदिक कर्मकांडांना महत्त्व देत नाही. संत ज्ञानेश्वरांनी दाखवलेल्या वाटेवर संतांनी चालून समाजाचे प्रबोधन केले. क्षुद्र-देवतांवर, कर्मकांडावर प्रहार करून 'विठ्ठल' हा एकच देव करावा आणि आचारधर्माचे पालन करावे असा संदेश दिला. वारकरी संप्रदायांनी भक्तीला खऱ्या अर्थाने मुक्त केले. तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान, नीतिविचार, लोकश्रद्धांचे उन्नयन, प्रचलित धर्मविचारांचे खंडन, संप्रदायाचे संघटन, ग्रंथनिर्मिती या योगे वारकरी संप्रदायाने भक्ती सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवली.

संतांनी माणसाच्या ठिकाणी ईश्वरभक्तीसाठी जिव्हाळा म्हणजेच प्रेम महत्त्वाचे मानले. हा प्रेम भक्तीचा धागा वारकरी आणि सुफी संप्रदायात आहे. अंतःकरणपूर्वक ईश्वराला साद घालणे (नामस्मरण) एवढी एकच गोष्ट भक्तीत महत्त्वाची मानली आहे. तुकोबा म्हणतात, 'गोड तुझे रूप गोड तुझे नाम । देई मज प्रेम सर्वकाळ।' भक्तीमध्ये भक्त आणि ईश्वर यांच्यातील प्रेमधागा संतांनी अधोरेखित केला. अर्थात, भक्तियोगामध्ये बाह्य उपाधीची आवश्यकता नाही. 'न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ॥ 'देवाच्या प्राप्तीसाठी वनात भटकण्याची गरज नाही असे तुकोबा म्हणतात.

वारकरी संप्रदायात भक्ती सगुण आणि निर्गुण दोन्ही पद्धतीने मान्य आहे. सगुण साकाराला जसे महत्त्व आहे. तसे निर्गुण निराकारालाही महत्त्व आहे. या तत्त्वामुळेच वारकरी संप्रदाय सर्वांपर्यंत पोहोचला. कारण इथे सगुण किंवा निर्गुण अशा एका भक्तीचा अट्टाहास पाहायला मिळत नाही. देव आणि भक्त हे एकापासूनच जन्मले असून ब्रह्म हा भक्तसुद्धा असतो ही अद्वैताची मांडणी 'अहं ब्रह्मास्मि' या ब्रह्मवाक्याच्या आधाराने मांडली गेली आहे.

भक्तीचा अधिकार सर्वांना आहे ही वारकरी संप्रदायाची लोकशाही आहे. भक्तीमध्ये उच्च-नीच किंवा जात-पात भेद पाळला जात नाही. सामान्य व्यक्तीलासुद्धा भक्तीचा अधिकार संतांनी दिला. एवढेच नाही तर भक्तीविषयी प्रबोधन करून भक्तिमार्ग सांगितला.

वारकरी संप्रदाय पांडित्याला महत्त्व देत नाही. माणसाकडे कितीही ज्ञान असले, तरी त्याच्या ठिकाणी

भक्तिभाव नसेल तर त्याचे पांडित्य किंवा ज्ञान काहीही कामाचे नाही, असे मानतात. भक्तिशिवाय ज्ञान हे त्याज्य मानले जाते. भक्ती आणि ज्ञान हे दोन मार्ग असले तरी ज्ञानयुक्त भक्तीला संतांनी महत्त्व दिले आहे. "पंडित तो चि भला। नित्य भजे जो विठ्ठला ॥''[६] तुकारामांनी तर पांडित्य, कर्मकांड आणि ढोंगीपणावर प्रहार केला आहे. पंडित तोच थोर जो विठ्ठलाची भक्ती करतो. भक्ती नसेल तर ते ज्ञान शून्य आहे. संत एकनाथ ईश्वराकडे भक्तिप्रेमाची मागणी करतात. "भक्तिप्रेमाविण। ज्ञान नको देवा"[७] (ए. गा. २८८६) भक्तिप्रेमाशिवाय ज्ञान नको म्हटले आहे. ज्ञान हे जरी श्रेष्ठ असले तरी त्याला भक्तीचे अधिष्ठान लागतेच. ज्ञानाचा उगम हा भक्तीतूनच होतो. भक्तीमुळेच ज्ञानाला महत्त्व प्राप्त होते. "भक्तीचे उदरी जन्मले ज्ञान। भक्तीने ज्ञानासी दिधले महिमान । भक्ती ते मूळ । ज्ञान ते फळ॥" ज्ञान हे जरी फळ असेल तर ज्ञानाचा पाया मात्र भक्ती हीच आहे. म्हणून वारकरी संप्रदायात भक्तीला सर्वोच्च मानले आहे.

वारकरी संप्रदायाचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी भक्तीला मुक्तीपेक्षाही सर्वोच्च स्थान दिले. उपासना ही भगवदप्राप्तीसाठी असते किंवा मानवाची कर्मापासून मुक्ती होण्यासाठी असते. पण संतांनी मुक्तीपेक्षा भक्तीला अधिक महत्त्व दिले. मोक्ष किंवा मुक्ती यामध्ये कोरडेपणा असून त्यात भक्तीचा आनंद नाही. या संदर्भात अनेक संतवचने आहेत.

माणसाला मोक्ष आणि मुक्ती यापेक्षाही 'भक्ती' महत्त्वाची आहे, असे वारकरी संतांचे मानणे आहे. केवळ मुक्ती काय कामाची? त्यात भक्तिप्रेमाचा कल्लोळ असायला हवा. मोक्षपदाला आम्ही तुच्छ लेखतो. आम्हाला पुढेही जन्म घेऊन विठ्ठलभक्तीच रसात बुडायचे आहे किंवा मुक्ती मिळाल्यानंतर संतसंगती कशी घडेल? असा उलट सवाल संतांनी केला आहे. म्हणजेच माणसाला ईश्वराकडे नेणाऱ्या अनेक ज्या वाटा आहेत किंवा ज्यायोगे आत्मसाक्षात्कार होतो, त्या सर्व योगामध्ये (मार्गामध्ये) भक्तियोगाचे स्थान हे अनन्यसाधारण असे आहे. भक्तीचा गोडवा गुरुदेव वासुदेव अभ्यंकर सांगतात, "मृदुंगावर सणकन् थाप पडली, टाळ बोलायला लागले आणि भक्तीने मधाळलेला स्वर ईश्वराला आळवायला लागला की त्यातून निर्माण होणारे नादब्रह्म विठ्ठलालाही डोलायला लावते. अद्वैताची खूण पटवते. भक्ती ही कर्माची भगिनी, ध्यानाची गंगोत्री आणि ज्ञानाची माता आहे."[८]

वारकरी संप्रदायात भक्तीला महत्त्व दिले आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पारंपरिक चार पुरुषार्थांबरोबरच भक्तीला पाचवा पुरुषार्थ मानले आहे. "चहूं पुरुषार्थ शिरीं। भक्ति जैसी"[९] (ज्ञा.१८.८६७) वारकरी संप्रदायाने भक्तीच्या माध्यमातून ईश्वराला सख्य बनवून मोक्ष प्राप्त केला. भक्तीचे महत्त्व संत जाणून होते. त्यामुळेच त्यांनी भक्तिमार्गाचा पुरस्कार केला. या संदर्भात अभ्यंकर म्हणतात, "देहदंड देणारा राजयोग सर्वसामान्य जनांना आवडत नाही. अलौकिक बुद्धीवर आधारलेला ज्ञानयोग पचत नाही आणि कर्मयोग आचरण्याइतकी कठोरता आणि कर्तव्यपरायणता त्यांच्यात असत नाही. देव हा भावाचा भुकेला असतो आणि भक्ती तर विशुद्ध भावाने भरलेली असते. म्हणूनच असेल, परंतु जनसामान्यांचा ओढा भक्तिमार्गाकडे अधिक असतो.''[१०] सर्वसामान्य लोक ग्रंथावर आधारलेल्या योगमार्गाकडे वळले नाहीत आणि ते त्यांना शक्यही नव्हते. या कारणामुळे संत भक्तिमार्गाकडे वळले.

वारकरी संतांनी किमान आध्यात्मिक क्षेत्रात भक्तांना त्यांच्या अंतःसामर्थ्याची जाणीव करून दिली. वारकरी संतांचे कार्य केवळ सांप्रदायिक स्वरूपाचे नसून, ती एक व्यापक चळवळ होती. हा भक्तिपंथ असल्याने तो केवळ विठ्ठल उपासकांपुरता मर्यादित न राहता शैव, नाथ, दत्त, चैतन्य आणि सूफी पंथातील उदार भक्तांना सामावून घेणारी चळवळ होती. संतांनी लोकभाषेला प्रतिष्ठा मिळवून

संस्कृती, धर्म, एकात्मता, समता या मूल्यांची जाणीव करून दिली.

**संदर्भग्रंथ:**


१. मनमाडकर दादामहाराज, 'वारकरी संप्रदाय तत्त्वज्ञान व सद्यकालीन औचित्य', मनमाडकर प्रकाशन, जून १९९८, पृ. ४८

२. जोशी प्र. न., 'भागवतपुराण', प्रसाद प्रकाशन, १९०४, पृ. ३६६

३. उनि., कसबे रावसाहेब, 'भक्ती आणि धम्म', पृ. १७१

४. तत्रैव, पृ. १६६

५. तत्रैव, पृ. ८७

६. 'श्री एकनाथी', शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई ४, मार्च, १९७१ प्रकाशन, एकनाथ महाराज अभंगाची गाथा, इंदिरा प्रकाशन, पुणे, पृ. २०९

७. तत्रैव, पृ. २२२

८. अभ्यंकर शं. वा. वारकरी संप्रदाय, पृ. ३३५

९. दांडेकर मामासाहेब, 'ज्ञानेश्वरी', संत वाङ्मयसेवा प्रकाशन, पंढरपूर, पृ.६६०

१०. अभ्यंकर शं. वा. वारकरी संप्रदाय, पृ. ३३६